विधी वैष्णव हिला दहावीमध्ये ९७.२० टक्के गुण

तेल्हारा, ता. ८ : ज्ञानपीठातून विधी प्रवीण वैष्णव ९७.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवित उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशामुळे कुटुंबासह शाळा व परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विधी ही शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण वैष्णव यांची मुलगी आहे तिच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फळ असल्याचे शिक्षकांनी सांगितले. शाळेचे संचालक मंडळ, प्राचार्या व शिक्षकवृंदांनी तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विधी हिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक आणि मित्रपरिवार यांना दिले आहे.

सेठ बन्सीधर दहिगावकर हायस्कूल एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित स्वामी विवेकानंद ज्ञानपीठचा या वर्षीही १०० टक्के उत्कृष्ट निकाल लागला. यावर्षी एकूण ९७ विद्यार्थी एसएससी बोर्ड परीक्षेला बसले होते. यापैकी एकूण ७२ विद्यार्थी विशेष प्रावीण्य श्रेणीमध्ये, तर २४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

मूर्तिजापूर हायस्कूलची यशस्वी भरारी

मूर्तिजापूर, ता. ८ : मूर्तिजापूर हायस्कूल, मूर्तिजापूरने यंदाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत पुन्हा एकदा आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत एकूण ९५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. शाळेचा एकूण निकाल ९४.७३ टक्के लागला असून, तालुक्यातील अग्रगण्य शाळा म्हणून संस्थेने आपला ठसा उमटविला आहे.

या परीक्षेत समीक्षा संघरत्न कांबळे हिने ९२.२० टक्के गुण मिळवून शाळेतून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. सम्यक राजू डोंगरे हा ९१.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर सृष्टी सचिन महल्ले हिने ८८.२० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला आहे. या यशस्वी क्षणाचे औचित्य साधत शाळेचे मुख्याध्यापक अनिल देविकर तसेच पर्यवेक्षक दिनेश बकाले यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी यशाचे श्रेय आई-वडील आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला दिले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेश्वर देशपांडे, संस्था सचिव शार्दुल दिगंबर आणि सदस्य विनायक वारे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शाळेतील शिक्षक मंगेश शिवणकर, समीर नानोटी, दिनेश खलेलकर, प्रतिभा दहे, मीना घुले, समीर उकंडे, सुनील चौधरी, संकल्प व्यवहारे तसेच इतर शिक्षक उपस्थित होते.

शहरासह पातूर तालुक्यात रेशनचा काळाबाजार

रेशन माफिया सक्रिय; शासकीय धान्य परप्रांतात करत आहेत विक्री; लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

■ **गोपाल बदरखे** : सकाळ वृत्तसेवा

पातूर, ता. ८ : शहरासह पातूर तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रेशनच्या धान्याचा काळाबाजार वाढला असून, याकडे पोलिस प्रशासन आणि महसूल प्रशासन तथा लोकप्रतिनिधींचे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे रेशन माफिया सक्रिय झाले असून, गोरगरिबांचे धान्य खरेदी करून ते सऱ्हासपणे परप्रांतात विक्री करत असल्याचे बोलले जात आहे.

पातूर तालुक्यामध्ये ९५ गावाचा समावेश असून, यावेळी शासनाकडून तीन महिन्याचे रेशन धान्य (गहू, तांदूळ) वितरित केले जात आहे. नागरिकांना मिळणारे धान्य खरेदी करण्यासाठी गुजरी लाइनमध्ये व्यापाऱ्यांची स्पर्धा लागली आहे. गुजरी लाईनमध्ये भर रस्त्यावर वाहने उभी करून तांदूळ विकत घेऊन नंतर मोठ्या वाहनाने माफियाच्या ठरलेल्या गोडाऊनवर पोहचविला जातो. शहरासह लगतच्या खेड्यांमधून तांदुळाचे कट्ट्याचे ऑटो भरून गुजरातमध्ये येऊन पाच-सहा दुकानावर त्याची विक्री केले जाते. त्यानंतर जमलेल्या माल हा मोठ्या वाहनात भरून त्याची विल्हेवाट माफियाच्या गोडाउनवर लावण्यात येते.

तालुक्यामध्ये रेशन माफियांनी मजुरी तत्वावर माणसे नियुक्त केले असून, गावात जाऊन शासकीय धान्य खरेदी करण्याचा सपाटा लावला आहे. यामध्ये काही शासकीय दुकानदार सुद्धा रेशन माफीयांसोबत सामील असून, त्यामुळे स्वस्तधान्य दुकानातच ग्राहकांना पैसे दिल्या जातात. जमा केलेला माल हा वेळ पाहुन माफिया नेत आहेत. शासनाकडून तीन महिन्याचे धान्य गहू, तांदूळ मिळत असून, यामध्ये मानसी तांदूळ मोठ्या प्रमाणात वितरित केल्या जात आहे. त्यामुळे शासकीय स्वस्त धान्य दुकानदारासोबत रेशनमाफिया साठेलोटे करत असून, हजारो क्विंटल तांदूळ जाग्यावर खरेदी केल्या जात आहे.

रेशन माफियांचे पातूर शहरासह तालुक्यामध्ये ग्रामीण विभागांमध्ये सुद्धा मोठेमोठे गोडाऊन असून, यामध्ये मोठ्या प्रमाणात शासकीय धान्य साठवले जाते आणि ट्रकच्या ट्रक शासकीय धान्य परप्रांतात विक्रीसाठी नेले जात आहेत. मात्र, यावर कुठल्याच प्रकारची कारवाई पोलिस प्रशासन आणि महसूल प्रशासन यांच्याकडून होत नसल्याने रेशन माफियांची चांदी होत आहे. रेशन माफियांचे हात लंबे असून, त्यांना मोठ्या प्रमाणात राजकीय पाठबळ सुद्धा मिळत आहे. त्यामुळे गोरगरिबांचा वाली कोणी उरला नसल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.





पातूर : रेशनच्या धान्याचे भरलेले पोते. तर दुसऱ्या छायाचित्रात रेशनचे धान्य खरेदी करून घेऊन जाणारा ट्रक.

> रेशनचे धान्य कोणी विकत घेत असेल किंवा रेशन माफिया सक्रिय असतील तर, आम्ही त्यांच्यावर कारवाई करू.
> **- शितल मोरखडे,** अन्नपुरवठा अधिकारी, पातूर

वास्तविक पाहता इतक्या मोठ्या प्रमाणात तांदूळ वितरित केल्या जातो आणि नागरिक एका महिन्यामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात असलेला तांदूळ खाऊ शकत नाही. त्यामुळे शासकीय धान्यांमध्ये परिवर्तन करणे आवश्यक असून, इतर कडधान्य सुद्धा वितरित करण्याची मागणी होत आहे.

> राशनचा विषय हा महसूल खात्याशी निगडित असल्यामुळे आम्ही कारवाई करू शकत नाही. मात्र, महसूल विभागाने जर कार्यवाही केली तर, आम्ही गुन्हे दाखल करू.
> **- हनुमंत डोपेवाळ,** ठाणेदार, पातूर

दिवस निघाल्याबरोबर शासकीय धान्य दुकानदाराच्या दुकानासमोर नागरिकांच्या रांगा लागलेल्या असतात, तर दुकानालगतच शासकीय धान्य खरेदी करणारे रेशन माफिया वजन काटा घेऊन तयार दिसत आहेत. त्यामुळे महसूल प्रशासनाकडून शहरांमध्ये फेरफटका मारण्याची आवश्यकता आहे, जेणेकरून रेशन माफियांना धाक निर्माण होईल आणि गोरगरिबांचे धान्य त्यांच्या घरापर्यंत जाईल, अशी अपेक्षा सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

लोकप्रतिनिधींच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह!

■ **बाळापूर विधानसभा मतदारसंघांमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात रेशनच्या धान्याचा काळाबाजार होत असताना लोकप्रतिनिधींकडून विधानभवनामध्ये कुठल्याच प्रकारची वाचता केली जात नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये लोकप्रतिनिधींविषयी संभ्रम वाढला असून, निवडून तरी दिले कशासाठी, असा प्रश्न मतदारांनाच पडला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडून सुद्धा शासकीय धान्याची परप्रांतात वाहतूक करून विक्री केली जात आहे. असे असताना स्थानिक गुन्हे शाखेकडून कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या भूमिकेबाबत संशय व्यक्त होत आहे.**

आ. पवार यांनी घेतली अत्याचारग्रस्त चिमुकलीच्या कुटुंबियांची भेट

प्रकरणाची जलदगती न्यायालयात सुनावणीची मागणी

■ **सकाळ वृत्तसेवा**

पातूर, ता. ८ : तालुक्यातील चान्नी पोलिस ठाणे हद्दीतील एका गावात दहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर ६० वर्षीय व्यक्तीने अत्याचार केल्याच्या संतापजनक घटनेनंतर आमदार रोहित पवार यांनी पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना धीर दिला. आरोपीला तत्काळ अटक करून प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालयात करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली.

माहितीनुसार, आरोपीने मुलीचे तोंड दाबून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला. ही घटना कुणाला सांगितल्यास आईला जिवे मारण्याची धमकीही दिल्याचे समोर आले आहे. दि.५ मे रोजी दुपारी ही घटना उघडकीस आल्यानंतर जिल्हाभरात संतापाची लाट उसळली. पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून चान्नी पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करत आरोपीच्या शोधासाठी मोहीम सुरू केली. या मोहिमेत पोलिस प्रशासन व वनविभागाच्या संयुक्त कार्यवाहीत आरोपीला अटक करण्यात आली.



पातूर : अत्याचारग्रस्त चिमुकलीच्या कुटुंबियांची भेट घेताना आमदार रोहित पवार, आमदार नितीन देशमुख व इतर पदाधिकारी.

या घटनेमुळे गावातील महिलांमध्ये आणि अल्पवयीन मुलींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्यात अशा घटना घडत असतील तर मुलींना जन्म देणेही कठीण होईल, अशी संतप्त प्रतिक्रिया महिलांनी व्यक्त केली.

पीडित कुटुंबीयांशी संवाद साधताना रोहित पवार यांनी आरोपीविरुद्ध कठोर कारवाईसाठी सातत्याने पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले. यावेळी आमदार नितीन देशमुख, स्थानिक गुन्हे शाखेचे शंकर शेळके, ठाणेदार रवींद्र लांडे यांच्यासह पोलिस अधिकारी उपस्थित होते.

शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली

■ **पीडित मुलगी शिक्षणात हुशार असल्याचे समजताच रोहित पवार यांनी तिच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी स्वीकारण्याची ग्वाही दिली. राज्यात वाढत्या अत्याचारांच्या घटनांबाबत कठोर कायदे करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त करत सरकारवर टीकाही केली.**

न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा

■ **या घटनेचे राज्यभर पडसाद उमटल्यानंतर रोहित पवार यांनी पीडित कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेऊन मुलीला न्याय मिळेपर्यंत आपण पाठपुरावा करत राहू, अशी ठाम ग्वाही दिली.**

आरोपीची पोलिसांच्या ताब्यातून धूम


मूर्तिजापूर, ता. ८ : न्यायालयाच्या रिमांड वॉरंटनुसार अकोला कारागृहात दाखल करण्यासाठी नेत असताना एका आरोपीने पोलिसांच्या ताब्यातून पळ काढल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या प्रकरणी मूर्तिजापूर शहर पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध कलम २६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय मधुकर रोडे (वय २५, रा. धोत्रा शिंदे, ता. मूर्तिजापूर) याला न्यायालयाच्या आदेशानुसार अकोला जेल येथे दाखल करण्यासाठी नेण्यात येत होते. दरम्यान, गुरुवारी (ता.७) सायंकाळी सुमारे ७.१५ वाजताच्या सुमारास आरोपीने पोलिस कॉन्स्टेबल पवन बोचरे यांच्या हाताला झटका देत पोलिसांच्या कायदेशीर रखवालीतून पळ काढला. या घटनेनंतर पोलिस विभागात एकच खळबळ उडाली असून, आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल साहील मुलानी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मूर्तिजापूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला.

अडगावात 'एक श्याम शहिदोंके नाम'

अडगाव बु., ता. ८ : स्थानिक पठाण पुरा टावरजवळ स्वातंत्र्यसेनानी शहिद टिपू सुलतान यांच्या शहिद दिनानिमित्त एक श्याम शहिदोंके नाम कार्यक्रमांतर्गत मुशायरा पार पडला.

टिपू सुलतान सेनेच्या वतीने आयोजित मुशायरा कार्यक्रमात सहभागी शायरांनी आपल्या शायरी आणि गझलांमधून टिपू सुलतान यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. यात महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातून आलेल्या शायरांनी उपस्थित चाहत्यांना त्यांच्या शायरीने मंत्रमुग्ध केले. टिपू सुलतान सेनेच्या वतीने आयोजित मुशायरा कार्यक्रमात मुस्तकीम अर्शद पुणे, अकबर ताज खंडवा, आकिब जमीर मुंबई, मुजम्मील अख्तर अडगाव बु., शफिक सादिक खांडवी, गुलाम फरिद मोनीस शिवाजी नगर, ज्योती जलल हरदा, शहेरे काजी अथहरहुसेन अडगाव बु., शाकिर अहेमद मोहाला यांचा सहभाग होता. कार्यक्रमाचे प्रास्तविक आयोजक अब्दुल कदिर ठेकेदार यांनी केले, तर मुशायराचे संचालन पुणे येथील मुस्तकिम अर्शद यांनी व आभार तौफिकअली यांनी मानले.



जाहीर प्रगटन

दि. ८/५/२०२६

तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार मोहन रुस्तम माघाडे, रा. सिंदखेडराजा, ता. जि. बुलढाणा यांनी दि. २५/१२/२०२५ रोजी श्री. सुदाम वाघ यांचेशी सौदा पावती केली होती. त्यानुसार माझे पक्षकार व श्री. सुदाम वाघ यांच्यामध्ये असे ठरले होते की, माझे पक्षकार यांनी सुदाम वाघ यांच्या सुनेच्या नावावर असलेली जमीन मौजे पिंपळनेर, गट नं. ५० मधील ३८ आर एकर बागायत क्षेत्र कविता वाघ यांच्या नावे असलेली जमीन कायम खरेदी करण्याची तयारी दर्शविली होती. त्यानुसार सदरील जमिनीचा सौदा १ कोटी २५ लाख रुपयांत झाला होता. त्यानुसार टोकन म्हणून रक्कम रु. ३ लाख हे आरटीजीएस द्वारे अदिती अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटी मर्या. बुलढाणा या शाखेत आरटीजीएस द्वारे सुदाम वाघ यांच्या नावे ट्रान्सफर दि. ५/१/२०२६ रोजी करण्यात आली होती व उर्वरीत २१ लाख रुपये सुदाम वाघ यांना नगदी स्वरुपात देण्यात आले होते व बाकीचे रक्कम जमिनीचे खरेदीखत करतेवेळी देण्याचे ठरले होते. परंतु सदरील जमिनीचे खरेदीखत आजपर्यंत माझे पक्षकार यांच्या सोबत झालेले नाही. आमचे पक्षकार यांना आता असे समजले आहे, सदरील जमिनीचे खरेदीखत हे सुदाम वाघ दुसरे पार्टीसोबत करण्याच्या तयारीत असल्याचे समजले आहे. त्यामुळे या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, सदरील जमीन गट नं. ५० मौजे पिंपळनेर, ता. देऊळगावराजा, जि. बुलढाणा या शेतजमिनीचे खरेदीखत खरेदी विक्री ट्रान्सफर हस्तांतर कोणीही करू नये. तसे केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदार लिहून घेणार यांची राहील. सदरील झालेला व्यवहार हा माझा पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही. सदरील प्रगटनावर कोणाचा काही आक्षेप असल्यास त्यांनी वरील दिलेल्या पत्त्यावर एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात कळवावा.

करिता सदरील जाहीर प्रगटन.

मार्फत जाहीर प्रगटन देणार : स्वाक्षरित

ॲड. प्रशांत एच. सुकाळे

प्लॉट नं. ११, फ्लॅट नं. ८, सुमीत स्क्वेअर, राजेशनगर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर. मो. ७५८८१९१०८९.

जाहिरात

शेती जमीन वहिती लिलाव

सन 2026-27

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की **जि.प माध्य विद्यालय वाशीम येथील सर्व्हे नंबर ५३९ व ५४० भोगवटदाराचे नाव एफ क्लास हायस्कुल वाशीम करिता ताब्यात व वापरात असलेली शेती मधील सर्व्हे ५३९ मधील १ हेक्टर २० आर शेत वहीती लीलाव प्रक्रिया सन २०२६-२०२७ या सत्रामध्ये** ११ महिन्याकरीता दिनांक १४/०५/२०२६ रोजी **ठिक १० वाजता** शेत वहिती लिलाव प्रक्रिया करण्याचे ठरविण्यात आले आहे करिता माहिती देण्यात येत आहे.

टिप :- शेत वहिती लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरीता रु 5000 रुपये अनामत रक्कम भरावी लागेल.

स्वा./-
मुख्याध्यापक तथा शेत वहिती लिलाव प्रक्रिया अधिकारी
जि.प विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय वाशीम

शिक्का

जाहीर नोटीस

कलम :- ३६ (१) (अ) (मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत)

सार्वजनिक न्यासाचे नांव :- समर्पण प्रतिष्ठाण मोठी उमरी अकोला, ता.जि.अकोला **नोंदणी क्रमांक :-** एफ - १६४२४ (अकोला)

वरील न्यासाने खालील वर्णनाची मालमत्ता विक्री करण्याकरीता दि.०३/०५/२०२६ कार्यकारी मंडळाच्या सभे मध्ये ठराव पारित केलेला असून इच्छुक लोकांना निविदा भरण्या करिता सोईचे व्हावे या दृष्टीने सदरहू जाहिर सुचना देण्यात येत आहे.

मालमत्तेचे वर्णन :- १. दि.२३/०६/२०१७ रोजीच्या दानपत्राव्दारे मिळालेली स्थावर मालमत्ता त्याचे वर्णन खालीलप्रमाणे, मौजे अकोला प्र.ता.जि. अकोला र.डी. र.स.डी. अकोला म.न.पा. अकोला हद्दीतील देशमुख फैल अकोला येथील नझुल शिट नं. ३५ बी, नझुल प्लॉट नं. ५/१५, जुना वार्ड नं.२७ एकुण क्षेत्र. ८१३ चौ.फुट, ७५.५ चौ.मिटर असून वापकी ३६२ चौ. फुटावर दोन मजली घर या पैकी १७२.५ चौ.फुट उत्तर दक्षिण वाटणीची पश्चिमेकडील लोडबेरींगचे स्लॅब असलेले बांधकामासह.

त्याची चतुः सिमा : पुर्वेस - माधव हरीभाऊ मानकर, **पश्चिमेस** - गुरूनानक मठ, **उत्तरेस** - गुलाबसिंगचे घर, **दशिक्षणेस** - सरकारी रस्ता तरी इच्छुक, व्यक्तींनी गरजुनी आपली निर्वीदा बंद लिफाफ्यात खालील दिलेल्या पत्यावर लेखी स्वरूपात पाठवावी.

अटी :- १) जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत खाली दिलेल्या पत्यावर आपली निविदा सिलबंद लिफाफ्यात पाठवावी. २)निविदा मंजुर झालेल्या धारकांना खरेदी खर्च व कोर्ट खर्च द्यावा लागेल. ३) इच्छुक व्यक्तींनी बंद लिफाफ्यावर आपले नाव, पत्ता व मोबाईल नंबर नमुद करावा. ४) घर विक्रीचा सौदा योग्य मोबदला न मिळाल्यास निविदा किंवा सौदा रद्द करण्याचा अधिकार संस्थेला राहील. ५) खरेदी मा.धर्मदाय सह. आयुक्त साहेब अमरावती यांची परवानगी मिळाल्यानंतर खरेदी करुन देण्यात येईल काही कारणास्तव परवानगी मिळाली नाही तर घर विक्री चा सौदा रद्द ठरवल्या जाईल दिलेल्या आगाऊ रक्कमेवर कोणत्याही प्रकरणाचे व्याज मिळणार नाही. ६) दि.१०/०६/२०२६ रोजी सर्व विश्वस्तांच्या समोर लिफाफे उघडण्यात येतील करीता सर्व निविदां धारकांनी दुपारी ०१.०० वाजता खालील दिलेल्या पत्यावर हजर राहावे.

दिनांक. ०८/०५/२०२६

पत्रव्यवहारांचा पत्ता :- संस्थेचे कार्यालय व्दारा
श्री. प्रमोद पुंडलीक काळमेघे
रा. गजानन वाटिका, मोठी उमरी, अकोला पिन कोड - ४४४००५

स्वा./-
अध्यक्ष
श्री. अमोल प्रल्हादराव मानकर
समर्पण प्रतिष्ठाण मोठी उमरी अकोला
र.न.एफ-१६४२४ अकोला

पंजाब नॅशनल बँक — punjab national bank (A Govt. of India Undertaking)

भारत सरकारचा उपक्रम

एआरएमबी, नाशिक
शॉप नं.2 व 3 मेझनाईन मजला, स्नेह हाईट अपार्टमेंट, इंदिरा नगर, नाशिक - 422009. फोन : 0253- 2323020, ईमेल- cs8288@pnb.bank.in

सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 मधील नियम 8 व 9 अन्वये तमाम लोकांकरीता ई-लिलाव विक्री नोटीस

स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री करण्याकरीता ई-लिलाव विक्री नोटीस
(सरफेसी कायदा, 2002 मधील नियम 8(6) अन्वये वैधानिक विक्री नोटीस)

सेक्युरिआयझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट ॲन्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टरेस्ट ॲक्ट 2002 कलम 13 (4) अंतर्गत मधील नियम 8(6), सेक्युरिटी इन्टरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या अन्वये स्थावर / अस्थावर मिळकतींची विक्री ई- लिलाव पध्दतीने करण्या संदर्भात

तमाम लोकांस व विशेषतः कर्जदार व हमीदार ज्यांचे वर्णन खालील तक्तामध्ये केले आहे त्यांना सदर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद स्थावर/ अस्थावर मिळकती ज्या सेक्युअर्ड क्रेडीटर यांचेकडे गहाण / ताब्यामध्ये आहेत, ज्याचा रचनात्मक / प्रत्यक्ष / प्रतिकात्मक ताबा अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर यांनी घेतला आहे. अधिकृत अधिकारी, त्यांची विक्री **"जसे आहे तसे", "जिथे आहे तिथे" व "जशी आहे" त्या स्थितीत" खालील तारखेस** कर्जदार/ गहाणदार / हमीदार यांचेकडून देय रक्कम वसूल करण्याकरीता, पंजाब नॅशनल बँक, सेक्युअर्ड क्रेडीटर, यांचेव्दारे करण्यात येणार आहे. राखीव किंमत व अनामत रक्कम व स्थावर मिळकतीचे किमान वर्णन व त्यावर असलेला बोजा (काही असल्यास) यांची माहिती खालीलप्रमाणे

लॉट क्र.	शाखेचे नाव खात्याचा नाव कर्जदार / जामीनदाराचे नाव आणि पत्ता	मिळकतीचे वर्णन आणि कर्जदार / गहाणदार यांची नावे	अ) मागणी सूचनाकलम १३(२) प्रमाणे दिनांक ब) थकबाकी रक्कम दि. ३१.०३.२०२६ रोजी क) ताबा दिनांक कलम १३(४) सरफेसी कलम २००२ प्रमाणे अ) ताबा प्रकार सांकेतिक / प्रत्यक्ष /रचनात्मक	अ) अनामत रक्कम (रु. लाख) ब) ईएमडी (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख) क) बोली वाढीव रक्कम	लिलावाचे दिनांक व वेळ	कर्जदारांच्या बोझाचा तपशील
१	**शाखा- पीएनबी - अकोला (०००९००) कर्जदार - मे. खुशी ट्रेडर्स प्रोप्रा. श्रीमती प्रियंका योगेश पलीवाल** पत्ता - दानापुर, ता. तेलहरा, जि. अकोला, महाराष्ट्र - ४४४ १०८ **तसेच राहणार मे. खुशी ट्रेडर्स प्रोप्रा. श्रीमती प्रियंका योगेश पलीवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८ **तसेच राहणार श्रीमती प्रियंका योगेश पलीवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८ **जामीनदार/ तारणदार - १. सौ. सुधा ताराचंद पलीवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८ **२. सौ. संगिता राजेश पलिवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८	लेआऊट प्लॉट नं. ३५-बी, फिल्ड सर्व्हे नं. ६४/१, शिवा नगर मागे, राजेश्वर नगर, गाडेगाव रोड, गाडेगाव, ता. तेलहरा, जि. अकोला. **मालकी हक्क - श्रीमती संगिता राजेश पलीवाल क्षेत्रफळ एरिया - १४९.६५ स्क्वे.मी. (१६१०.२३ स्क्वे.फुट) अंदाजे चतुःर्सिमा - उत्तर -** लेआऊट रस्ता, **दक्षिण -** प्लॉट नं. ३५ (ए), **पुर्व -** प्लॉट नं. ३६ (ए) **पश्चिम -** लेआऊट रोड **प्रोप्रायटी आयडी - PUNB0082880031**	अ) ०१.०६.२०२४ ब) रु. १,४८,०३,८६०.२९/- + इतर व्याज क) २२.०८.२०२४ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. १०.५६ लाख ब) रु. १.०५६ लाख दि. (२६.०५.२०२६) क) रु. ०.१०लाख	दि. २६.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही
२	**शाखा- पीएनबी - अकोला मेन (०००९००) कर्जदार - मे. कृष्णा ट्रेडर्स प्रोप्रा. सुधा ताराचंद पलीवाल** पत्ता - लक्ष्मी इंडस्ट्रीज, तहसिल रोड, गाडेगाव, ता. तेलहरा, जि. अकोला- ४४४ १०८ **प्रोप्रायटर सौ. सुधा ताराचंद पलीवाल** पत्ता - वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८ **जामीनदार १. सौ. प्रियंका योगेश पलिवाल** पो. दानापुर, ता. तेलहरा, अकोला, महाराष्ट्र - ४४४१०८ **२. सौ. संगिता राजेश पलिवाल** पत्ता- वार्ड नं. १३, राम मंदिर जवळ, तेलहरा जि. अकोला, महाराष्ट्र- ४४४ १०८	१. रहिवाशी प्लॉट नं. २८ आणि २९, फिल्ड सर्व्हे नं. ७२/२ ए, मौजे गाडेगाव, लक्ष्मी ट्रेडर्सच्या बाजुला, तहसिल रोड, ता. तेलहरा, जि. अकोला क्षेत्रफळ एरिया - ४३७.२५ स्क्वे.मी. (४७०४.८१ स्क्वे.फुट) अंदाजे **मालकी हक्क - सुधा ताराचंद पलीवाल चतुःर्सिमा - उत्तर -** प्लॉट नं. ३०, **दक्षिण -** सरकारी रस्ता , **पुर्व -** लक्ष्मी इंडस्ट्रीज **पश्चिम -** लेआऊट रोड **प्रोप्रायटी आयडी - PUNB1HA65110601**	अ) २२.१२.२०२२ ब) रु. १,३५,८९,५२३.८९/- + इतर व्याज क) २३.०३.२०२३ ड) सांकेतिक ताबा	अ) रु. ३९.५६ लाख ब) रु. ३.९५६ लाख (दि. २६.०५.२०२६) क) रु. १.०० लाख	दि. २६.०५.२०२६ वेळ सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत	माहित नाही

विक्री ही सेक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम २००२ च्या विहित केलेल्या अटी व शर्ती खालील प्रमाणे

1. मालमत्तेची विक्री जशी आहे तशी आणि जशी आहे तशी आणि जे काही आहे ते आहे वर विक्री केली जात आहे.
2. खाली नमूद सुरक्षीत मालमत्तेची माहिती ही अधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहितीनुसार नमूद केली आहे, परंतू अधिकृत अधिकारी हे त्यामध्ये असलेल्या कोणत्याही तृटीस, चुकीची माहितीस वा काही चुकल्यास उत्तर देण्यास जबाबदार राहणार नाहीत.
3. सदर विक्री ही दिनांक, **26.05.2026** @ सकाळी 11.00 ते संध्या. 4.00 वर **https://baanknet.com** वेबसाईटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली दिलेल्या स्वाक्षरीकर्ताद्वारे केली जाईल
4. ई-लिलावात सहभागी होण्यासाठी बोलीदाराने राखीव किंमतीपेक्षा किमान एक बोली अनिवार्यपणे सादर करणे आवश्यक आहे.
5. विक्रीच्या तपशीलावर अटी व नियमांसाठी कृपया **www.pnb.bank.in.** आणि **https://baanknet.com** ही वेबसाईट पाहावी

दिनांक - ०९.०५.२०२६
स्थळ - नाशिक

टीप : स्वैर भाषांतर; तफावत आढळल्यास मूळ इंग्रजी मजकूर ग्राह्य

स्वाक्षरी/-
श्री. सजील कुमार
मुख्य व्यवस्थापक आणि अधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक, (सिक्युअर्ड क्रेडिटर)